Shivaji College Library Kannad


दिव्य - मराठी दि. 02/07/20

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची मदत

## मुख्यमंत्री सहायता निधीसाठी सात लाख चौऱ्यांन्नो हजार तिनशे बेचाळीस रुपयांची मदत

कन्नड / प्रतिनिधी

कोरोना या विषाणूने जगभर थैमान घातले आहे या संकटाच्या पार्श्वभूमिवर कन्नड येथील श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सामाजिक जाणिवेच्या भावनेतून मुख्यमंत्री सहायता निधी कोविड-१९ ला सामोरे जाण्यासाठी ७९४३४२ रुपयाचा( सात लक्ष चौऱ्यांन्नो हजार तिनशे बेचाळीस रुपये) चा निधी जमा केला आहे.श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत शाळा, महाविद्यालयातर्फे हा निधी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार, संस्थेचे सचिव डॉ.पी.के. निकम, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले यांच्या हस्ते हा निधी (ता.१ जुलै) रोजी सदरील निधीचा धनादेश औरंगाबादचे जिल्हाधिकारी उदय चौधरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला




आहे. यापूर्वीही मार्च, एप्रिल, मे मध्ये संस्थेच्या वतीने स्थलांतरीत मजूर, गरीब, भटके, आदी समाजातील गरजूंना कन्नड शहर व कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात किराणा सामान, या सह जीवनावश्यक वस्तुंचे वाटप संस्थेचे पदाधिकारी, अशोकराव आहेर, डॉ.आनंद महाले, चंद्रकांत देशमुख, अप्पा साहेब देशमुख, बाबासाहेब मोहिते, कृष्णा पाटील व कर्मचारी यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. त्याशिवाय आज हा निधी देण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री मानसिंह बाळासाहेब पवार म्हणाले की कोविड १९ कोरोना विषाणूचे भयंकर संकट समाजावर ओढवले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी एकजूट दाखवून सामोरे गेले पाहीजे. शासन व प्रशासन आपापल्या पातळीवर प्रयत्न करीतच आहे, परंतु समाजातील दानशूर व्यक्ति, संस्था, संघटना, सामाजिक कार्यकर्ते यांनी शासन व प्रशासनाच्या बाजूने उभे राहून आपण सामाजिक बांधिलकी व सामाजिक जाणिवेतून पुढे आले पाहीजे आमची संस्था, शाळा, महाविद्यालय नेहमीच सामाजिक भान ठेऊन नैसर्गिक आपत्ती व समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होऊन आर्थिक मदत करीत असते. यापूर्वीही आम्ही संकटकाळी मदत केली आहे. कोरोनाचा सामना करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी यांनी वेळोवेळी सर्वतोपरी मदत केली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. मानसिंह बाळासाहेब पवार, सचिव डॉ.पी.के. निकम, प्राचार्य डॉ.विजय भोसले यांची उपस्थिती होती.

दैनिक शिवनातीर
आकीब शेख पत्रकार
02 जुलै 2020

Shivaji College Library * Kannad *

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची मदत



कन्नड (आकीब शेख ) कोरोना या विषाणूने जगभर थैमान घातले आहे . या संकटाच्या पार्श्वभूमिवर कन्नड येथील श्री . छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सामाजिक जाणिवेच्या भावनेतून मुख्यमंत्री सहायता निधी कोविड १९ ला सामोरे जाण्यासाठी ७९४३४२ रुपयाचा ( सात लक्ष ९४ हजार तिनशे बेचाळीस रू ) निधी जमा केला आहे . श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत शाळा , महाविद्यालयातर्फ हा निधी संस्थेचे अध्यक्ष श्री मानसिंह बाळासाहेब पवार , संस्थेचे सचिव , डॉ .पी. के . निकम , शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ॰ . विजय भोसले यांच्या हस्ते हा निधी ( ता .१ जुलै ) रोजी सदरील निधीचा धनादेश औरंगाबादचे जिल्हाधिकारी उदय चौधरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे . यापूर्वीही मार्च , एप्रिल , मे मध्ये संस्थेच्या वतीने स्थलांतरीत मजूर , गरीब , भटके , आदी समाजांतील गरजूंना कन्नड शहर व कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात किराणा सामान , या सह जीवनावश्यक वस्तुंचे वाटप संस्थेचे पदाधिकारी , अशोकराव आहेर , डॉ . आनंद महाले , चंद्रकांत देशमुख , अप्पा साहेब देशमुख, बाबासाहेब मोहिते , कृष्णा पाटील व कर्मचारी यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते . त्याशिवाय आज हा निधी देण्यात आला . या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री मानसिंह बाळासाहेब पवार म्हणाले की , कोविड १९ ,को रोना विषाणूचे भयंकर संकट समाजावर ओढवले आहे . या संकटाचा सामना करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी एकजूट दाखवून सामोरे गेले पाहीजे . शासन व प्रशासन आपापल्या पातळीवर प्रयत्न करीतच आहे , परंतु समाजातील दानशूर व्यक्ति , संस्था , संघटना , सामाजिक कार्यकर्ते यांनी शासन व प्रशासनाच्या बाजूने उभे राहून आपण सामाजिक बांधिलकी व सामाजिक जाणिवेतून पुढे आले पाहीजे . आमची संस्था , शाळा , महाविद्यालय नेहमीच सामाजिक भान ठेऊन नैसर्गिक आपत्ती व समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होऊन आर्थिक मदत करीत असते .

यापूर्वीही आम्ही संकटकाळी मदत केली आहे . कोरोनाचा सामना करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी , कर्मचारी यांनी वेळोवेळी सर्वतोपरी मदत केली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले . याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री . मानसिंह बाळासाहेब पवार , सचीव डॉ॰ .पी .के. निकम , प्राचार्य डॉ . विजय भोसले यांची उपस्थिती होती .

2

Shivaji College Library
Kannad

# मुख्यमंत्री साह्यता निधीसाठी छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची मदत



तालुका प्रतिनिधी / २ जुलै

**कन्नड** : कोरोना विषाणूने जगभर थैमान घातले आहे. या संकटाच्या पार्श्वभूमिवर कन्नड येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने सामाजिक जाणिवेच्या भावनेतून मुख्यमंत्री सहायता निधी कोविड १९ ला सामोरे जाण्यासाठी ७ लाख ९४ हजार ३४२ रुपयांचा निधी जमा केला आहे. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत शाळा, महाविद्यालयातर्फे हा निधी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार, संस्थेचे सचिव डॉ.पी.के.निकम, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले यांच्या हस्ते हा निधी बुधवारी दि.१ जुलै सदरील निधीचा धनादेश औरंगाबादचे जिल्हाधिकारी उदय चौधरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार म्हणाले की, कोरोना विषाणूचे भयंकर संकट समाजावर ओढावले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी एकजूट दाखवून सामोरे गेले पाहीजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार, सचीव डॉ.पी.के.निकम, प्राचार्य डॉ.विजय भोसले यांची उपस्थिती होती.

ePaper देशोन्नती
Fri, 03 July 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/58259235

दिव्य मराठी 09/07/2020

Shivaji College Library Kannad

# ग्रामीण भागात वाङ्मयीन चळवळ वृद्धिंगत करण्याची गरज - डॉ . आनंदराव महाले

कन्नड :ता.८ ग्रामीण भागात विद्यार्थी व तरुण पिढी मोबाईल व व्यसनांच्या आहारी गेली आहे .विद्यार्थी दशेत ध्येय समोर ठेऊन वाटचाल करणे आवश्यक असते . त्यासाठी पुस्तकांचे वाचन व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरते . नव्या पिढींना कृतिप्रवन करुन त्यांना वाचन व लेखनाची प्रेरणा देण्यासाठी ग्रामीण भागात वाङ्मयीन चळवळ वृद्धिंगत करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कन्नड येथील डॉ . भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ . आनंदराव महाले यांनी केले .( ता .८ ) येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे त्रैमासिक तिफणच्या अंकाचे प्रकाशन डॉ . आनंदराव महाले , प्राचार्य डॉ . विजय भोसले , प्रोफेसर डॉ . प्रतिभा अहिरे , डॉ . प्रकाश खेत्री , संपादक डॉ . शिवाजी हुसे यांच्या हस्ते करण्यात आले .प्रसंगी डॉ . महाले पुढे म्हणाले की , वाचना शिवाय व्यक्तिमत्वाची जडणघडण होऊ शकत नाही . त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करून आपल्या आयुष्याला दिशा द्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले . याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . विजय भोसले म्हणाले की , तिफण त्रैमासिक गेल्या दहा वर्षापासून सातत्याने प्रकाशित होत असून तिफण ने महाराष्ट्र भर आपला लेखक वाचक वर्ग निर्माण केला आहे . कन्नड सारख्या ग्रामीण भागातील महाविद्यालयातून डॉ . शिवाजी हुसे हा अंक प्रकाशित करीत आहे याचा प्राचार्य म्हणून मला विशेष आनंद वाटतो . हे काम त्यांनी नेटाने पुढे न्यावे त्यासाठी सर्वतोपरी मदत करू असे मत व्यक्त केले . प्रख्यात परिवर्तनवादी कवयित्री व विचारवंत , प्रोफेसर डॉ . प्रतिभा अहिरे म्हणाल्या की , तिफण ने उपेक्षित , वंचित लेखक कविंचा शोध घेऊन त्यांना लिहिते केले . अनेक उपक्रमाच्या माध्यमातून नव लेखकांना संधी देऊन हक्काचा मंच उपलब्ध करून दिला . तिफणचे हे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे . यावेळी डॉ . शिवाजी हुसे यांनी आपली भूमिका विशद केली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन तिफण संपादक मंडळाचे सदस्य डॉ . प्रकाश खेत्री यांनी केले .



दिव्य मराठी
औरंगाबाद जिल्हा 11-07-2020

Shivaji College Library * Kannad *

# कन्नड : सहा प्राध्यापक संशोधकांना ट्रान्सडर्मल ड्रग डिलिव्हरीसाठी पेटंट

प्रतिनिधी | कन्नड


डॉ. युसूफ हनिफ शेख


डॉ. अब्दुल रऊफ खान


डॉ. अब्दुल जलील


डॉ. मजहर फारूखी


डॉ. क्रांती झाकडे


डॉ. सुरेखा मुंडे

औरंगाबाद व कन्नड येथील सहा संशोधकांनी दाखल केलेले पेटंट अर्ज मंजूर करून घेत भारतीय सरकारच्या पेटंट कार्यालयात अधिकृतपणे प्रकाशित केले आहेत.

नियंत्रित विद्युत पल्सचा वापर करून ट्रान्सडर्मल ड्रग डिलिव्हरीसाठी कमी किमतीची, आक्रमक नसणारी यंत्रणा शोधण्यासाठी भारत सरकारने औरंगाबाद व कन्नड शहरातील सहा संशोधकांना पेटंट प्रकाशित केले आहे. हे उपकरण 'आयांटोफोरेन्सिस पॉवर सप्लाय अँड डेटा अॅक्विझिशन सिस्टिम' अॅनालॉग स्वरूपातील डेटा डिजिटल स्वरूपात रेकॉर्ड करण्यास सक्षम आहे. जे अभ्यासामध्ये वापरल्या जाणाऱ्या उपकरणाद्वारे येऊ शकते.

पेटंटबद्दल सविस्तर माहिती देताना डॉ. सुरेखा मुंडे यांनी सांगितले की, आयांटोफोरेसिस पॉवर सप्लाय अँड डेटा acquisition सिस्टिम ही नावीन्यपूर्ण, अतिशय कमी किमतीची, आक्रमक नसणारे तंत्र आहे. यामध्ये त्वचेद्वारे औषध वाहतुकीच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करता येतो. या उपकरणात स्विचिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या मायक्रो कंट्रोलर डेव्हलपमेंट बोर्ड आणि इलेक्ट्रॉनिक सर्किटवर आधारित आहे. वापरलेल्या मायक्रो कंट्रोलमध्ये अॅनालॉग सिग्नल डिजिटल स्वरूपात रूपांतरित करण्याची क्षमता तसेच विद्युत पल्सचा कालावधी व ड्यूटी सायकल बदलता येते हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

हे संशोधन मागील काही वर्षांपासून शहराच्या मौलाना आझाद महाविद्यालयातील डॉ. अब्दुल रऊफ खान, पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुरेखा विष्णुपंत मुंडे, जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. क्रांती झाकडे, शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालय कन्नडचे प्रा. डॉ. युसूफ हनीफ शेख, मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मझहर अहमद नसिरुद्दीन फारूकी आणि डॉ. अब्दुल जलील अब्दुल हक यांच्या परिश्रमाचे फलित आहे. मौलाना आझाद महाविद्यालयाने संशोधकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.

सकाळ 12 जुलै 20

# औरंगाबादच्या पाच, कन्नडच्या एका प्राध्यापक संशोधकाचे पेटंट प्रकाशित

## मौलाना आझाद महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत केले संशोधन

कन्नड-औरंगाबाद, ता. ११ : औरंगाबाद शहरातील पाच, कन्नडमधील एक अशा येथील सहा संशोधकांनी दाखल केलेले पेटंट अर्ज मंजूर करून घेत भारतीय सरकारच्या पेटंट कार्यालयाने ते अधिकृतपणे प्रकाशित केले आहेत.

नियंत्रित विद्युत पल्सचा वापर करून ट्रान्सडर्मल ड्रग डिलिव्हरीसाठी कमी किंमतीची, आक्रमक नसणारी यंत्रणा शोधण्यासाठी भारत सरकारने औरंगाबाद व कन्नड शहरातील सहा संशोधकांचे पेटंट प्रकाशित केले आहेत. हे उपकरण 'आयांटोफोरेसिस पॉवर सप्लाय अँड डेटा ॲक्विझिशन सिस्टीम' ॲनालॉग स्वरूपातील डेटा डिजिटल स्वरूपात रेकॉर्ड करण्यास सक्षम आहे. जे अभ्यासामध्ये वापरल्या जाणाऱ्या उपकरणाद्वारे येऊ शकते.


प्राचार्य डॉ. मजहर फारुकी


डॉ. अब्दुल जलील


डॉ. क्रांती झाकडे


डॉ. युसूफ हनिफ शेख


डॉ. अब्दुल रऊफ खान


डॉ. सुरेखा विष्णुपंत मुंडे

पेटंटबद्दल सविस्तर माहिती देताना डॉ. सुरेखा मुंडे यांनी सांगितले की, आयांटोफोरेसिस पॉवर सप्लाय अँड डेटा ॲक्विझिशन सिस्टीम म्हणजे नावीन्यपूर्ण, अतिशय कमी किंमतीचे, आक्रमक नसणारे तंत्र असून, यामध्ये त्वचेद्वारे औषध वाहतुकीच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करता येतो. या उपकरणात स्विचिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या मायक्रो कंट्रोलर डेव्हलपमेंट बोर्ड आणि इलेक्ट्रॉनिक सर्किटवर आधारित आहे. वापरलेल्या मायक्रो कंट्रोलरमध्ये ॲनालॉग सिग्नल डिजिटल स्वरूपात रूपांतरित करण्याची क्षमता तसेच विद्युत पल्सचा कालावधी आणि ड्युटी सायकल बदलता येते. हे संशोधन मागील काही वर्षांपासून औरंगाबादच्या मौलाना आझाद महाविद्यालयातील डॉ. अब्दुल रऊफ खान, पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुरेखा विष्णुपंत मुंडे, जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. क्रांती झाकडे, कन्नडच्या शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयातील प्रा. डॉ. युसूफ हनिफ शेख, मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मझहर अहमद नासिरुद्दीन फारुकी आणि डॉ. अब्दुल जलील अब्दुल हक यांच्या प्रयत्नांचे फलित आहे.

मौलाना आझाद महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत या संशोधकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

Shivaji College Library * Kannad *

Shivaji College Library
Kannad

लोकमत समाचार

# औरंगाबाद और कन्नड़ के शोधार्थियों का पेटेंट प्रकाशित

कन्नड़। 17 जुलाई। लोस सेवा

भारत सरकार द्वारा औरंगाबाद और कन्नड़ शहर के छह शोधार्थियों का पेटेंट प्रकाशित हुआ है. नियंत्रित विद्युत पल्स का प्रयोग कर ट्रांसडर्मल ड्रग डिलीवरी के लिए कम दाम वाली, नॉन इनवेसिव तकनीक की खोज करने वाले औरंगाबाद और कन्नड़ के शोधार्थियों ने जो उपकरण तैयार किया है, वह 'अ सिस्टम फॉर आयांटोफोरेसिस पॉवर सप्लाय एंड डेटा अक्विजिशन' अनालॉग डेटा डिजिटल रूप में रिकॉर्ड करने में सक्षम है.


डॉ रऊफ खान


डॉ अब्दुल जलील


डॉ यूसुफ हनीफ शेख



डॉ क्रांति झाकड़े


डॉ सुरेखा मुंडे


डॉ मजहर फारुख

पेटेंट के संदर्भ में विस्तार से जानकारी देते हुए डॉ सुरेखा मुंडे ने बताया कि 'अ सिस्टम फॉर आयांटोफोरेसिस पॉवर सप्लाय एंड डेटा अक्विजिशन' यह नया, कम दाम वाला, नॉन इनवेसिव यंत्र है. इसके माध्यम से त्वचा द्वारा दवाई वहन प्रबंधन का अध्ययन किया जाता है. यह उपकरण स्विचिंग के लिए प्रयोग में लाए जाने वाले माइक्रो कंट्रोलर डेवलपमेंट बोर्ड और इलेक्ट्रॉनिक सर्किट पर आधारित है. प्रयोग में लाए गए माइक्रो कंट्रोलर अनालॉग सिग्नल डिजिटल रुप में तब्दील करने की क्षमता और विद्युत पल्स की अवधि और ड्यूटी साइकिल में बदलाव इसकी खासियत है.

गत कई वर्षों से जारी यह अनुसंधान शहर के पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालय की


लॉंटोफोरोफिस पॉवर सप्लाई एंड डेटा एक्विजिशन सिस्टम.

प्राध्यापिका डॉ सुरेखा विष्णुपंत मुंडे, मौलाना आजाद महाविद्यालय के डॉ अब्दुल रऊफ खान, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय की डॉ क्रांति झाकड़े, शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालय के प्राध्यापक डॉ यूसुफ हनीफ शेख, मौलाना आजाद महाविद्यालय के प्रधानाचार्य डॉ मजहर अहमद नसीरुद्दीन फारुकी और डॉ अब्दुल जलील अब्दुल हक आदि की मेहनत का नतीजा है. मौलाना आजाद महाविद्यालय की प्रयोगशाला में इस शोध के लिए शोधार्थियों को सभी सुविधाएं उपलब्ध कराई गई थीं.

Apna Aurangabad
Page No. 3 Jul 18, 2020
Powered by: erelego.com

+1


Shivaji College Library * Karhad *

# श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कोरोना योद्ध्यांचा सत्कार

**तालुका प्रतिनिधी / १७ ऑगस्ट**

**कन्नड :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने कोरोना योद्ध्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रथम ध्वजारोहण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनी कोरोना संसर्गजन्य आजारात लढणाऱ्या विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधींचा सन्मानपत्रं ,शाल देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर होते. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य



डॉ. विजय भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, कोरोना संसर्गजन्य महामारीच्या काळात विविध आघाड्यांवर जनसेवा करणारे व लढणारे योध्दे हे देशसेवकच आहेत. अशा व्यक्तींचा शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात येत आहे. या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश सातव,मुख्याधिकारी नंदा गायकवाड, डॉ.डी.एन.देगावकर, डॉ.प्रविण पवार, डॉ.हेमंत गावंडे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शिवकुमार हजारे, डॉक्टर रवींद्र मोरे, डॉक्टर ए.एस.घोडके, डॉ.अविनाश गायके आदी कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेचे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ePaper देशोन्नती
Tue, 18 August 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/58259252

17/10/2020

17 oct. 20.

प्रतिनिधी:-सागर पाटील कन्नड

दैनिक मराठवाडा साथी

www.marathwadasathi.in

Shivaji College Library * Kannad *

6

# वाचन संस्कृती वाढल्याशिवाय देश महासत्ता होणार नाही - प्राचार्य डॉ. भोसले



**मराठवाडा साथी न्यूज**

कन्नड। ग्रंथालये ही ज्ञान स्त्रोत आहेत. त्यामुळे गावोगावी व शाळा, महाविद्यालयात तसेच वाडी, वस्तीवर ग्रंथालये सुरू होणे अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा समाजात ग्रंथालयांची व उत्तम जाणकार वाचकांची संख्या वाढणार नाही तोपर्यंत विवेकी व सुसंस्कृत समाज निर्माण होणार नाही. त्यासाठी वाचन संस्कृती वाढविण्याची नितांत गरज असून, त्याशिवाय देश महासत्ता होणार नाही, असे प्रतिपादन येथील प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले. ते माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी बोलत होते.

मराठी व ग्रंथालय विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालयात करण्यात आले होते. यावेळी उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, प्रा. संतोष देशमुख, प्रा. आतिष मेहेत्रे, ग्रंथालय कर्मचारी अशोक काळे, चंद्रशेखर पाटे आदी उपस्थित होते. डॉ. विजय भोसले यांनी वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

पुण्य नगरी

18/10/2020.

# जनसामान्यांसाठी बँकेचे दरवाजे खुले -पांडे

Shivaji College Library
Kannad

कन्नड : कोविड-१९ कालावधीत ग्राहकांना कोणकोणत्या सुविधा बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या आहे आणि त्याचा ग्राहकांना कशा प्रकारे फायदा घेता येईल यासह जनसामान्यांसाठी बँका नेहमीच सेवेत असल्याचे प्रतिपादन स्टेट बँकेचे मुख्य व्यवस्थापक सूर्य नारायण पांडे यांनी केले. येथील शिवाजी महाविद्यालयात वाणिज्य व संगणक शास्त्र विभागांतर्गत कोविड-१९ संसर्ग कालावधीत बँकांची भूमिका व कार्य या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पांडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले होते तर शाखा व्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया कन्नडचे उत्तम बदाले, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर उपस्थित होते. सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. मंगेश जाधव यांनी केले. यावेळी वाणिज्य विभागाचे डॉ. मिना वडगुळे, राकेश आहिरराव यांचे सहकार्य लाभले.

Shivaji College Library
Kannad

सकाळ
औरंगाबाद, सोमवार, २१ डिसेंबर २०२०



कन्नड : योगीराज गुलाबराव सोमवंशी यांना शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र भूषण प्रेरणा राज्यस्तरीय आदर्श प्राध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## योगीराज सोमवंशी यांचा सन्मान

**कन्नड :** छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कारप्राप्त निसर्गमित्र समिती आणि आदर्श गाव टेंभे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील रसायनशास्त्राचे प्राध्यापक योगीराज गुलाबराव सोमवंशी यांना महाराष्ट्र भूषण प्रेरणा राज्यस्तरिय आदर्श प्राध्यापक पुरस्काराने रविवारी (ता.२०) रोजी सन्मानित करण्यात आले आहे. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन पदवीधर आमदार सुधीर तांबे, शिक्षक आमदार किशोरजी दराडे, तुषार दादा शेवाळे व इतर मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याबद्दल शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले, सहकारी प्राध्यापक आणि मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

मंगळवार, २२ डिसेंबर २०२० MY औरंगाबाद पुढारी



## प्रा.सोमवंशी यांना पुरस्कार प्रदान

कन्नड : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शहरातील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. योगीराज सोमवंशी यांना महाराष्ट्र भूषण प्रेरणा राज्यस्तरीय आदर्श प्राध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्गमित्र समिती आणि आदर्श गाव टेंभे ग्रामपंचायत यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला असून त्याचे वितरण आ. सुधीर तांबे, आ. किशोर दराडे, तुषार शेवाळे या मान्यवरांच्या हस्ते यांच्या हस्ते करण्यात आले.सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

Shivaji College Library * Kannad *

# छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा 'कोरोना योद्धा' सन्मान



देशोन्नती वृत्तसंकलन...

**कन्नड** ■ जागतीक महामारी कोरोना या जगातिक महामारीच्या काळात सामाजिक बांधिलकी मानत. संस्थेचे सन्मानिय अध्यक्ष मानसिंहजी पवार यांनी स्वयंस्फुर्तपणे प्रशासनाला महाविद्यालयातील वसतीगृह उपलब्ध करून दिले. लॉक डाऊनच्या काळात मध्य प्रदेश, गुजरात व खानदेशाला चालत जाणाऱ्या कामगार व मजुर यांना राहण्याची व जेवणाची व्यवस्था शिवाजी महाविद्यालयात करण्यात आली. तसेच जागतिक महामारीच्या काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ८ लाख रुपयांची मदत संस्थेच्या वतीने करण्यात आली. समाजीक उत्तरदायीत्व मानले. या सर्व बाबींची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या वतीने मंगळवार दि.२६ रोजी कन्नड - सोयगाव मतदार संघाचे उदयसिंगजी राजपुत, कन्नड येथिल उपविभागीय अधिकारी मा. जनार्दन विधाते, तहसीलदार संजयजी वारकड यांचा हस्ते श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ यांना कोरोना योद्धा म्हणून सन्मानित करण्यात आले. यावेळी सन्मानपत्र संस्थेचे उपाध्यक्ष अशोकरावजी अहेर अण्णा आणि प्राचार्य डॉ. व्ही.एन.भोसले यांनी स्वीकारले.(ता.प्र.)

ePaper देशोन्नती
Thu, 28 January 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/

Shivaji College Library
Kannad

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी. गुरुवार, २८ जानेवारी २०२१

# कन्नड : क्रीडा संकुलात ध्वजवंदन

उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते यांच्या हस्ते कन्नड तालुका क्रीडा संकुलात सकाळी सव्वानऊ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आमदार उदयसिंग राजपूत, तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, मुख्याधिकारी शेख हारुण, पोलिस निरीक्षक रामेश्वर रेंगे, सुनिल नेवसे, गटशिक्षण अधिकारी अश्विनी लाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरवर्षी होणारे सांस्कृतिक कार्यक्रम कोरोनामुळे झाले नाही. एनसीसी विद्यार्थ्यांचे संचालन व नवोदय विद्यालयाच्या विद्यार्थी बॅण्ड पथकाने ध्वजारोहणा नंतर सलामी दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते यांनी कोरोना काळात नागरिकांनी प्रशासनाला केलेल्या सहकार्या बद्दल आभार व्यक्त केले. तर आमदार उदयसिंग राजपूत यांनी आपल्या भाषणात कोरोना काळात प्रशासनाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल गौरौद्गार काढले. तहसिलदार संजय वारकड यांनी वेगवेगळ्या मार्गाने कोरोना काळात प्रशासनाला सहकार्य करणारे दानशूर नागरिक, समाजसेवक व सेवाभावी संस्था यांचे आभार व्यक्त करून उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुक्यातील पाच आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी एक लाखाचा शासकीय मदतीचा धनादेश देण्यात आला. तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच बारामती अग्रो, शिवाजी महाविद्यालय, कॉन्व्हे संस्था पुणे यांच्यासह १८ सेवाभावी संस्थांना व कोरोना काळात मदतीला धावून आलेले समाजसेवक तसेच तालुक्यातील ७० पत्रकार यांना कोरोना काळात प्रशासनाला सहकार्य करून जनजागृतीचे कार्य केल्यामुळे 'कोरोना योद्धा' संबोधून सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. कोरोना योद्धा, प्रतिष्ठित नागरिक,आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबिय, समाजसेवक, पोलिस अधिकारी, पुरस्कार प्राप्त मान्यवरांसह मोजकेच नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक योगेश पाटील यांनी केले.

Shivaji College Library
Kannad

सकाळ
औरंगाबाद, शुक्रवार, २९ जानेवारी २०२१ ११

**कन्नड शहर**

**कन्नडः** प्रजासत्ताक दिनाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त उपविभागीय अधिकारी जांनार्धन विधाते यांच्या हस्ते कन्नड तालुका क्रीडा संकुलात ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी आमदार उदयसिंग राजपूत, तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, मुख्याधिकारी शेख हारून, पोलिस निरीक्षक रामेश्वर रेंगे, सुनील नेवसे, गट शिक्षण अधिकारी अश्विनी लाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एनसीसी विद्यार्थ्यांचे संचालन व नवोदय विद्यालयाच्या विद्यार्थी बॅण्ड पथकाने सलामी दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते यांनी कोरोना काळात नागरिकांनी प्रशासनाला केलेल्या सहकार्या बद्दल आभार व्यक्त केले तर आमदार उदयसिंग राजपूत यांनी आपल्या भाषणात कोरोना काळात प्रशासनाने केलेल्या उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल गौरौद्गार काढले. यावेळी पाच आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांला एक लाख रुपयाचे धनादेश देण्यात आले. याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच बारामती अग्रो, शिवाजी महाविद्यालय, कॉन्व्हेंट संस्था पुणे यांच्यासह १८ सेवाभावी संस्थांना, ७० पत्रकार यांना 'कोरोना योद्धा' संबोधून सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शिक्षक योगेश पाटील यांनी केले.

Shivaji College Library
Kannad

सकाळ
औरंगाबाद, रविवार, ३१ जानेवारी २०२१ १०

# व्यवस्थापन परिषदेवर डॉ. अहिरे बिनविरोध

## दुसऱ्या जागेसाठी डॉ. विलास खंदारेंसह सहा अर्ज

सकाळ वृत्तसेवा

औरंगाबाद, ता. ३० : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी येत्या १२ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. तत्पूर्वी महिला गटातून आमदार सतीश चव्हाण प्रणित उत्कर्ष पॅनलकडून डॉ. प्रतिभा अहिरे यांचा शनिवारी (ता. ३०) एकच अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (कलम ३० (४) (आय) अंतर्गत विद्या परिषदेतून दोन सदस्य निवडले जातात. निवडणूक प्रक्रियेअंतर्गत २२ ते ३० जानेवारी दरम्यान नामांकन दाखल झाली होती. दुसऱ्या जागेसाठी उत्कर्ष पॅनलकडूनच डॉ. विलास खंदारे हे निवडणूक लढवत असून, त्यांच्यासह सहा अर्ज आहेत. सत्यप्रेम घुमरे, किशोर साळवे, प्रो. ई. आर. मार्टिन, शांताराम रायपुरे, दादासाहेब गजहंस यांनीही अर्ज केले आहेत. विद्या परिषदेच्या निवडून आलेल्या एकूण जागांपैकी डॉ. खंदारे हे एकमेव उमेदवार आहेत.



औरंगाबाद : व्यवस्थापन परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर डॉ. प्रतिभा अहिरे यांचा सत्कार करताना उत्कर्ष पॅनलचे सदस्य.

दुसऱ्या जागेसाठीचे इतर उमेदवार अभ्यास मंडळावर नियुक्त अध्यक्ष आहेत. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी कुलसचिव व अपिलीय अधिकारी कुलगुरू यांच्या निर्णयावर या जागेचा निकाल अवलंबून आहे. डॉ. अहिरे यांच्या बिनविरोध निवडीमुळे व्यवस्थापन परिषदेत उत्कर्ष पॅनलचे पारडे जड झाले आहे. परिषदेत पॅनलच्या आठ सदस्यांचे संख्याबळ आहे. इतर एका जागेसाठी निवडणूक झाल्यास १२ फेब्रुवारीला मतदान प्रक्रिया होईल.

लोकमत
गुरुवार ११.०२.२०२१

# शिवाजी महाविद्यालयात ई -परिषदेचे आयोजन

**कन्नड :** शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ फेब्रुवारीला दोन दिवसीय ई-राष्ट्रीय परिषद होत आहे. यात विद्यार्थी, प्राध्यापकांनी सहभागी होण्याचे आवाहन अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश कदम व शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले आहे.

Shivaji College Lib...
Kannad

Shivaji College Library * Kannad *

दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद, रविवार, १४ फेब्रुवारी, २०२१ . ४

**दिव्य मराठी विशेष** • स्व. किसनकाका कोल्हे यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा

# 'किसनकाकांनी केले शेतकऱ्यांसाठी भरीव काम'

प्रतिनिधी | कन्नड

शेतामध्ये माझी कोपं तिला बोराटीची झाप, तिथे राबतो माझा शेतकरी बाप' ही शेतकरी बापाची कविता व या कवितेसह एकापेक्षा एक सरस कवितेचे सादरीकरण करून प्रा.इंद्रजित भालेराव यांनी आनंदीबाई कोल्हे शाळेचे प्रांगण कधी आल्हाददायक, तर कधी डोळ्याच्या कडा पाणवायला लावून मंत्रमुग्ध केले. निमित्त होते स्व.किसनकाका कोल्हे यांच्या तृतीय पुण्यस्मरणाचे.



स्व.किसनकाका कोल्हे यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना इंद्रजित भालेराव आणि इतर मान्यवर.

किसन काका यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त आनंदीबाई कोल्हे प्राथमिक शाळेच्या प्रांगणात शुक्रवार दि.१२ रोजी प्रा.इंद्रजित भालेराव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रा.भालेराव म्हणाले स्व. किसानकाका कोल्हे यांनी भारतीय सैन्यात असतांना देशाची सेवा केली आणि सेवानिवृत्ती नंतर समाजासाठी व शेतकऱ्यांसाठी भरीव काम करून स्वाभिमानाने आणि ताठ मानेने ते वाघासारखे जगले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संजय खांबायते होते तर माजी नगराध्यक्ष अब्दुल वाहेद,नगराध्यक्षा स्वाती कोल्हे,राष्ट्रवादीचे नेते संतोष कोल्हे,बबनराव बनसोड,जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव,प्राचार्य डॉ.विजय भोसले,दीपक पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष तथा गटनेते संतोष कोल्हे यांनी केले.

पुढे कवी इंद्रजित भालेराव म्हणाले की, बाप ही कविता पाचवीच्या पुस्तकात पहिल्यांदा समाविष्ट केली. त्यानंतर अन्य पाठ्यक्रम बदलूनही ती दोन वेळा पाचवीला कायम ठेवण्यात आल्याने एकदा शेवाळकर गमतीने मला म्हणाले, की तुझी कविता पाचवीलाच पुजलेली आहे. तब्बल एक तपाहून अधिक काळ ही कविता अभ्यासक्रमात असल्याने किमान सात कोटी मुलांपर्यंत ती पोहोचल्याचे भालेराव यांनी सांगितले. तर, 'काट्याकुट्याचा तुडवित रस्ता, माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' ही शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याचे महत्त्व विशद करणारी कविता आणि

'शिक बाबा शिक, लढायला शिक, कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक', विद्यार्थ्यांसह उपस्थितांचा प्रतिसाद मिळवून गेली अखेरीस 'दोन जीवाची माय मही गेली दूरच्या शेताला' हे कविता सादर करून उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा ओलवल्या.

यावेळी व्यासपीठावर सुलतान भाईजी, मुख्तार खासाब, अरुण देशमुख, बाबुराव निकम, उत्तमराव वाघ, तात्याराव कदम, प्रा.रंगनाथ लहाने, संपतराव केरे, अनिता दीदी, जयराम पाटील धनवाई, मुख्याध्यापिका संगीता कोल्हे यांची प्रमुख उपस्थितीती होती.

# शहाजी राजे हे स्वराज्य संस्थापक होते - डॉ.जगदिश भेलोंडे

Shivaji College Library Kannad



देशोन्नती वृत्तसंकलन...

**कन्नड :** शिव चरित्राची मांडणी वेगवेगळ्या पद्धतीने सोयीची केली जाते. शिवरायाचा इतिहास विशिष्ट जाती व गयापुरता मांडल्या जातो. शिवचरित्राचे जाणिव पूर्वक विकृतीकरण केले गेले. स्वराज्य निर्मितीमध्ये शहाजी राजाचे मोठे योगदान होते. शहाजी राजे केवळ स्वराज्य संकल्पक नव्हते तर ते स्वराज्य संस्थापक होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते व इतिहास संशोधक डॉ.जगदिश भेलोंडे यांनी केले. शुक्रवारी (ता.१९) येथील शिवाजी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ.विजय भोसले होते. तर मंचावर उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.प्रतिमा अहिरे, बाबुलाल काळे, कार्यालयीन अधिक्षक यांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. स्वराज्याच्या निर्मितीत शहाजी राजेंचे योगदान या विषयावर डॉ.भेलोंडे यांनी अभ्यास पूर्ण मांडणी केली. पुढे बोलतांना ते म्हणाले की, श्रीलंकेपर्यंत शहाजी राजांचे राज्य होते. शहाजी राजे हे दक्षिणेतील सर्वात बलाढ्य सरदार होते. छत्रपती शिवरायांना प्रत्यक्ष प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळत होते. त्या दृष्टिने शिवराय व शहाजी राजे यांच्या तील पत्रव्यवहार महत्वाचा आहे. स्वराज्याची भक्कम पायाभरणी शहाजी राजांनी केली, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.मीना वडगुळे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

ePaper देशोन्नती
Sun, 21 February 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/58850751

Shivaji College Library * Kannad *

सकाळ औरंगाबाद, गुरुवार, ४ मार्च २०२१

## मराठी भाषा गौरव दिन साजरा

**कन्नडः** मराठी भाषेला ज्ञानभाषाचा दर्जा मिळावा यासाठी ज्येष्ठ साहित्यिक कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचे भरीव योगदान आहे तसेच मराठी साहित्य व संस्कृती क्षेत्रात कुसुमाग्रजांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले. शिवाजी महाविद्यालय येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पत्रकार विठ्ठल शिरसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यानिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. तसेच निरनिराळ्या विषयावरील विविध पुस्तकांचे प्रदर्शनात मांडण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. यावेळी ग्रंथपाल संतोष देशमुख, डॉ.मदन कानडे, डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ. सुनील गोरडे, प्रा. सीताराम मोगल, डॉ. रवींद्र घोती, डॉ. अनिल क्षीरसागर, प्रा. संजय भालेराव, डॉ.संघई यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रामचंद्र झाडे यांनी केले तर आभार मराठी विभाग प्रमुख तिफणकार प्रा. शिवाजी हुसे यांनी मानले.

Shivaji College Library
Kannad

22

# कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

## वक्तृत्व स्पर्धा म्हणजे भाषिक आत्मशोध - डॉ.दासू वैद्य

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कन्नड** ■ येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवारी दि.२ करण्यात आले होते. स्पर्धेसाठी 'कोरोनाचा समाज जीवनावर झालेला परिणाम' हा विषय ठेवण्यात आला होता. स्पर्धेचे उद्‌घाटन डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.विलास खंदारे व डॉ.प्रतिमा अहिरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर यांनी भूषविले. या प्रसंगी सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते, तहसिलदार संजय वरकड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के.मगर उपस्थित होते. सुत्रसंचालन डॉ.रामचंद्र झाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.भानुसे के.एल. यांनी केले.



**स्पर्धेचा समारोप व बक्षिस वितरण** डॉ.बा.आं.म.विद्यापिठाचे प्र-कुलगुरु डॉ.श्याम शिरसाट व विद्यापिठातील मराठी विभागाचे विभाग प्रमुख दासू वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना दासू वैद्य म्हणाले की, वक्तृत्व स्पर्धा म्हणजे भाषेच्या माध्यमातुन घेतलेला आत्मशोध असतो. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना भाषा कमवावी लागते असा संदेश दिला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कवि अरुण थोरात, अनिता चव्हाण, प्रविण दामाडे यांनी काम पाहिले. (ता.प्र.)

ePaper
Fri, 05 March 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/59146809

लोकमत
शुक्रवार १२.३.२०२१

Shivaji College Library * Kannad *



कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसह विविध मान्यवर.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कन्नड :** शिवाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. कवी दासू वैद्य यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे उपाध्यक्ष अशोक आहेर होते. याप्रसंगी संस्थेचे सदस्य अन्वर शेख, प्राचार्य डॉ. विजय भोसले, प्रा. डॉ. बी. के. मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिथून दत्तात्रय माने (डी.पी.भोसले कॉलेज, सातारा), द्वितीय पारितोषिक तेजस्वीनी नाथराव केंद्रे (शिव छत्रपती कॉलेज, औरंगाबाद), तृतीय पारितोषिक गणेश ज्ञानदेव लोळगे (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय कोल्हापूर ) यांनी प्राप्त केले. उत्तेजनार्थ

पारितोषिक सुजित बाळासाहेब मेहेने (विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर) व आदिती अरविंद सुरंगळीकर (बद्रीनारायण बारवाले, महाविद्यालय, जालना) यांनी पटकाविले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कवि अरुण थोरात, अनिता चव्हाण, प्रवीण दाभाडे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. के.एल. भानुसे यांनी केले तर आभार डॉ.रामचंद्र झाडे यांनी मानले.

Shivaji College Library * Kannad *

लोकमत समाचार 7
औरंगाबाद सोमवार, 8 मार्च 2021

# आयुर्वेदिक कृषि की ओर ध्यान दें नई पीढ़ी

## कन्नड़ में आयुर्वेद पर व्याख्यान का आयोजन

कन्नड़। 7 मार्च। लोस सेवा

स्थानीय शिवाजी महाविद्यालय में आयुर्वेदिक औषधीय पौधों के संग्रह और उनके उपयोग पर पिछले दिनों व्याख्यान का आयोजन किया गया. मुख्य अतिथि डॉ अरविंद ढाबे ने इस अवसर पर कहा कि आयुर्वेद में छह मुख्य प्रथाएं हैं. इनमें मासिक धर्म, दिनचर्या, शरीर विज्ञान, भोजन का सेवन, आहार प्रमुख हैं. उन्होंने आयुर्वेद के चार सूत्र भी पढ़े तथा बीमारी के कारणों, लक्षणों, निदान और उपचार के साथ-साथ पूर्ण कर्म, पंचकर्म के बारे में जानकारी दी.




कन्नड़ के शिवाजी महाविद्यालय में गत दिवस आयोजित व्याख्यान में आयुर्वेदिक औषधीय पौधों की जानकारी देते हुए उपप्राचार्य डॉ भाऊसाहब मगर.

बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय औरंगाबाद, साइंस एंड टेक्नोलॉजी विभाग भारत सरकार और शिवाजी कला एवं वाणिज्य महाविद्यालय के सहयोग से आयोजित व्याख्यान की अध्यक्षता उपप्राचार्य डॉ भाऊसाहब मगर ने की. प्रा प्रतिभा अहिरे भी कार्यक्रम में उपस्थित थीं.

ढाबे ने आगे कहा कि नई पीढ़ी को आयुर्वेदिक कृषि की ओर रुख करना चाहिए. विभिन्न औषधीय पौधों और उनके उपयोग पर गहराई से मार्गदर्शन करते हुए उन्होंने कहा कि इनमें चित्रक, हिरदा, बेहड़ा, मलकानगोनी, हिंगनबेट, गुवेल, काली मुसली, अश्वगंधा, कोरपद, कल्लवी, बावची माका, दिक्माली, चारोली, सलाई, महू, पलास, खैर, मेधसिं, पंगारा, शतावरी शामिल हैं. उन्होंने औषधीय पौधों जैसे धायती, अदरक, हल्दी, केसर, बादाम, मक्कादि, ब्राह्मी, मुरुडशेंग, आंवला, पंगरा, अमलतास आदि के बारे में भी जानकारी दी.

कोरोना के प्रकोप के मद्देनजर उन्होंने जायफल, बेपत्ती, दालचीनी, अदरक, तुलसी, हर्बल चाय, काली मिर्च और दाल चीनी का काढ़ा बनाकर पीने की भी सलाह दी.

कार्यक्रम को सफल बनाने के लिए इंद्रजाल जिवाणे, गणेश गवली और सीमा डोंगरे ने कड़ी मेहनत की.

कार्यक्रम में विद्यार्थी औ[...] उपस्थित थे. संचालन [...] क्षीरसागर ने किया.

आज.. आत्ता.. झरझर नजर राज्य जिल्ह्यवार्ता शहर भारत सिता...



Shivaji College Library * Kannad *

**औरंगाबाद : तहसील कार्यालयात उभारले सॅनिटायझर टनेल मशीन...**

Published on: 14 Apr 2020, 9:55 am IST




श्री छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाची मदत...

INSTALL APP CHANGE STATE SEARCH MORE

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाची मदत...

**हेही वाचा-** ईटीव्ही भारत विशेष: लॉकडाऊनमध्ये आदिवासी शिक्षितपेक्षाही समजूतदार..

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालय हे प्रमुख प्रशासकीय केंद्र आहे. यामुळे येथे दररोज अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची ये-जा असते. येणाऱ्या प्रत्येकाचे निर्जंतुकीकरणासाठी तालुक्यातील रेल येथील अनिस गफूर बागवान यांनी मोठ्या कल्पकतेने बनवलेल्या सॅनिटायझर टनेल मशिनचा वापर करण्यात आला आहे, असे बाबासाहेब मोहिते यांनी सांगितले.

यावेळी उपविभागीय महसूल अधिकारी जनार्धन विधाते, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश सातव, तहसीलदार संजय वारकड, शहर पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर रेंगे, ग्रामीण पोलीस निरीक्षक सुनील नेवसे, संस्थेचे संचालक डॉ. ए.के.महाले, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष तथा संस्थेचे संचालक बाबासाहेब मोहिते, वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता देगावकर, डॉ.प्रवीण पवार, विलास पवार यांची उपस्थिती होती.

College Library






## औरंगाबाद : तहसील कार्यालयात उभारले सॅनिटायझर टनेल मशीन...

Published on: 14 Apr 2020, 9:55 am IST

**कन्नड शहरातील शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने तहसील कार्यालयाला स्वयंचलित सॅनिटायझर टनेल मशीन मोफत भेट देण्यात आली आहे. याच्या माध्यमातून तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे निर्जंतुकीकरण होणार आहे.**

**औरंगाबाद-** कन्नड शहरातील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने तहसील कार्यालयाला स्वयंचलित सॅनिटायझर टनेल मशीन मोफत भेट देण्यात आली आहे. याच्या माध्यमातून तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे निर्जंतुकीकरण होणार आहे.

26

औरंगाबाद